# दिनांक १९-११-२००९ रोजीच्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा दि.१९/११/२००९ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. निवासी उप जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीस सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्ष, उपस्थित सदस्य व निमंत्रितांचे स्वागत करुन मा.अध्यक्षांचे अनुमतीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

| अक्र | संस्थचे/घटकाचे नांव | मुददा/विषयाचे स्वरुप | संबंधित विभाग/कार्यालय | कार्यवाहीची सद्यःस्थिती. |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे. प्रसाद इंडस्ट्रिज, बांगीवाडा, मालवण | खांडोळकर मार्गापासून मे. प्रसाद इंडस्ट्रिज या कारखान्यापर्यंत रस्ता तयार करुन देणेबाबत | १) मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण | सदस्य सचिवांनी दिनांक १४/९/२००९ चे जिल्हा उद्योग मित्र समिती सभेत नगरपरिषदेने मे.प्रसाद इंडस्ट्रिज, यांना दिलेली मूळ परवानगी, मंजुर नकाशा तसेच लगत भुखंडातील बांधकाम परवागी तसेच अकृषिक परवागनी आदेश यांचे अवलोकन व झालेली खरेदिखते व त्यामध्ये नमुद केलेले पोच रस्ते, त्यांची मालकी, व वाहीवाटीस दिलेले हक्क इत्यादी सर्व मुद्यांवर चर्चा होवून पोचमार्गास अडचण करणारे अनधिकृत बांधकाम असेल तर ते काढून टाकावे व रस्ता उद्योग घटकास उपलब्ध करुन देण्याच्या सक्त सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या जेणेकरुन भविष्यात काही आपतकालीन परिस्थती उद्‌भवल्यास उद्योग घटकांपर्यंत अग्नीशमन दलाचे बंब सहज पोहचू शकेल तसेच कारखान्यापर्यंत अवजड वाहनाची वाहतुक करणे शक्य होईल. सदर कार्यवाही मुख्याधिकारी, नगर परिषद,मालवण यांनी पुढील सभेपर्यंत पूर्ण करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सक्त सुचना मा. अध्यक्षांनी निर्गमीत केल्या होत्या. त्या अनुषंगाने मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण यांनी त्यांचे पत्र दि.२८/१०/२००९ अन्वये त्यांचा अहवाल पुढीलप्रमाणे सादर केला असल्याचे सभागृहास सांगितले.<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण यांनी यापूर्वी सादर केलेला खुलासा/म्हणणे याची योग्य छाननी न होता अर्जदाराने मांडलेल्या चुकीच्या मुद्यांच्या आधारे त्यांना कार्यवाही करणेच्या सूचना देण्यात येत असल्याचे व दि.१४/८/२००९ रोजीच्या प्रत्यक्ष साईट व्हीजीट दरम्यान नगररचनाकार, सिंधुदुर्ग यांनी संबंधित अर्जदारास नगरपरिषद, नगररचना विभाग व इतर संबंधित शासकिय विभागाकडून देण्यात आलेली परवानगी व मंजूर नकाशा प्रत हजर करण्याच्या सूचना देऊनही अर्जदाराने नगरपरिषद अथवा नगररचनाकार यांचेकडे यापूर्वी वा दि.१४/८/२००९ रोजीच्या स्थलतपासणीचे वेळी सादर केलेले नाहीत. तसेच नगररचनाकार यांनी सदर रस्ता/पाणंद व प्रसाद इंडस्ट्रीज या जागेची मोजणी करुन भूमी अभिलेख कार्यालयाकडील मोजणी नकाशा सादर करण्याच्या सूचना अर्जदारास देवूनसुध्दा अर्जदाराने पुर्तता केलेली नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | विकास आराखडयात प्रसाद इंडस्ट्रीज या कारखान्यापर्यंन्त येण्यासाठी प्रस्तावित/नविन रस्ता समाविष्ट नाही. सबब संबंधित जमिनधारकांच्या सम्मतीशिवाय किंवा संबंधितांकडून रस्त्यासाठी जमिन प्राप्त करुन घेवून नगरपरिषदेकडे हस्तांतरीत केल्याशिवाय नगरपरिषदेला रस्ता तयार करुन देणे कायदेशिररित्या शक्य नसल्याचे मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी नमुद केले आहे. त्याचप्रमाणे सन १९७८ मध्ये तत्कालीन नगररचनाकार, रत्नागिरी यांनी कोणत्या अटी/शर्तीनुसार व पोचमार्गास कोणत्या तरतुदीनुसार परवानगी दिलेली आहे त्या परवानगीची प्रत नगर पालिकेस दिलेली नसल्याने त्याबाबत खातरजमा करता येत नाही. त्याचप्रमाणे अर्जदाराने सर्व अर्जांमध्ये सदर रस्त्याची जागा ही सरकारी मालकीची असल्याचे नमुद करुन सदरची जागा मा.जिल्हाधिकारी यांचे अखत्यारित येत असल्याचे कळविले आहे. अर्जदारास या म्हणण्यादृष्टयर्थ सदर जागेचे ७/१२ उतारे किंवा प्रापर्टी कार्ड सादर करण्यास नगर रचनाकार यांनी दि.१४/८/२००९ रोजीचे साईट व्हीजीट दरम्यान सूचीत केले आहे.<br>वरीलप्रमाणे मुख्याधिकारी नगरपरिषद, मालवण यांनी व नगररचनाकार यांच्या दि.१४/८/२००९ चे साईट व्हीजीट दरम्यानच्या सूचना व निरीक्षण यांचा विचार केल्यास अर्जदार यांची मागणी कायदेशिररित्या वैध नसल्याने नगर परिषद स्तरावर मागणीप्रमाणे तुर्त रस्ता तयार करुन देता येत नसल्याचे नमुद केले आहे. मात्र अर्जदाराने नमुद केलेप्रमाणे सदर रस्त्याची जागा शासकिय मालकीची असल्यास ती नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करुन देण्याबाबत संबंधित कार्यलयास सूचीत करणेस व अर्जदार यांची मागणी असलेली रस्त्यासाठीच्या जमिनीचा ताबा नगर परिषदेकडे प्राप्त झाल्यास सदर जागेतून रस्ता तयार करुन देण्याची कार्यवाही नगर परिषदेकडून करण्यात येणार असल्याचे नगर परिषदेच्या अहवालात नमुद आहे.<br>वरील अहवालाचे मा.अध्यक्षांनी अवलोकन करुन अशा सूचना केल्या की, मे.प्रसाद इंडस्ट्रीज, या घटकाच्या कारखान्यास लागणारे औद्योगिक परवाने १) औद्योगिक वापराकरीता बीन शेती परवाना प्रत २) नगरपरिषदेचा औद्योगिक वापराकरीता कारखाना सुरु करण्याकरीता नाहरकत दाखला ३) नगर परिषदेचा इमारत बांधकाम मंजुरी आदेश ४) स्थाई लघु उद्योग नोंदणी प्रत ५) वन विभागाचा सॉ मिलकरीता परवाना अद्यावत नुतनीकरणासह ६) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा कंन्सेन्ट टू ऑपरेट प्रमाणपत्र सादर केल्यास पुढील बैठकीत आवश्यक ती कार्यवाही करणेत येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मे. सावंत स्टील प्रा. लि. उद्यम नगर, कुडाळ | सातबारा उता-यामधील फेरफार नोंदीबाबत | तहसिल कार्यालय, कुडाळ | सदस्य सचिवांनी सदर विषया संदर्भात सभागृहास विदित केले की, मा. तहसिलदार,कुडाळ यांना प्राप्त प्रतीवर अभिप्राय पाठविण्यासंबंधी योग्य त्या सूचना देण्यात येणार असल्याचे दि.१४/९/२००९ रोजीच्या सभेत मा.अध्यक्ष यांनी सांगितले होते.<br>सदर विषयाबाबत सातबारा उता-यामधील फेरफार नोंदी तलाठी वेताळबांबार्डे यांनी अद्यावत करुन श्री.व्ही.के.सावंत यांचे मालकीची नोंद ७/१२ उता-यावर अद्यावत करुन दिली असल्याचे मे.सावंत स्टील्स प्रा.लि.,उद्यमनगर, कुडाळ,यांनी त्यांचे पत्र दि.१०/११/२००९ अन्वये कळविले असून अध्यक्षांचे व सदस्य सचिव,जि.उ.कें.यांचे आभार मानले असल्याचे सांगितले. सदर विषय विषय सुचिवरुन वगळणेस अनुमती असावी. अध्यक्षांनी सदर विषय विषय सूचिवरुन वगळणेस अनुमती दिली. |
| ३ | **आयत्यावेळचा विषय** | | | |
| | श्रीमती निलिमा-डिसिल्वा दळवी | पर्यावरणाचा समतोल राखणेबाबत मार्गदर्शन | जीटीझेड् प्रोक्लीमा नवी दिल्ली | श्रीमती निलिमा डिसिल्वा दळवी, फोकल पॉईण्ट महाराष्ट्र, यांनी कार्बन टेट्राक्लोराईडचा वापर करुन पर्यावरणाचा समतोल राखणेसाठी प्रयत्न कसे करावेत याबाबतची सविस्तर माहिती सभागृहास अवगत करुन दिली. |

सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे सदस्य सचिवांनी जाहिर केले.

Sd/
(भास्कर साळुंखे)
सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग मित्र समिती व
जिल्हा उद्योग केंद्र,सिंधुदुग

sd/
(एस.आर.बर्गे)
अध्यक्ष तथा निवासी उप जिल्हाधिकारी
सिंधुदुर्ग.

Zum mtg 191109